**ठळक बातम्या**

- बियाणे उत्पादन क्षेत्रातल्या खासगी कंपन्यांनी संशोधन आणि विकासाला प्राधान्य द्यावं, असं केंद्रीय कृषीमंत्र्याचं आवाहन

- राष्ट्रीय गोपाळ रत्न पुरस्कारासाठी यंदा राज्यातल्या दोन दुग्धोत्पादक शेतकऱ्यांची निवड

- दिल्ली कारस्फोट प्रकरणी आमीर राशीद याला १० दिवसांची एनआयए कोठडी

- बांगलादेशाच्या माजी प्रधानमंत्री शेख हसिना यांना तिथल्या न्यायालयाने सुनावली फाशीची शिक्षा

**आणि**

- सौदी अरेबियात उमरा यात्रेसाठी गेलेल्या किमान ४० भारतीयांचा बस अपघातात मृत्यू

**<><><><><>**

पारंपरिक बी-बियाणांच्या संवर्धनाच्या आवश्यकतेवर भर देण्याची गरज असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं आहे. चौहान यांच्या हस्ते आज मुंबईत आशियाई बियाणे परिषदेचं उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करुन उत्पादन वाढ, तसंच कीड आणि कीटनाशकावर नियंत्रण मिळवण्याच्या दिशेनं संशोधन करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. शेतीतला रसायनांचा वापर कमी करण्यासाठी नवोन्मेषाची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं. भरड धान्य उत्पादन वाढलं तर भारताची अन्न सुरक्षा मजबूत होईल, असं कृषी मंत्री म्हणाले.

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.

हवामान बदलाचा सर्वात मोठा फटका कृषी क्षेत्राला सहन करावा लागतो. त्यामुळे होणारं नुकसान टाळण्यासाठी शाश्वत कृषी पद्धतींचा अवलंब आवश्यक आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. या कामात भारताकडे असलेलं पारंपरिक बीज साठवणीच्या पद्धतीचं ज्ञान उपयोगी पडेल, असं ते म्हणाले…

**- - होल्ड- बाईट- मुख्यमंत्री - -**

उदघाटन समारंभानंतर कृषी मंत्री आणि मुख्यमंत्र्यांनी कार्यक्रमस्थळी सुरु असलेल्या विविध स्टॉल्सना भेट दिली.

<><><><>

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अंतर्गत विदर्भातील अडीच हजार हेक्टर क्षेत्रावर यंदा ४० हजार क्विंटल बीजोत्पादन होणार आहे. त्यामध्ये सोयाबीन तूर उडीद मूग आणि आंबा या पिकाच्या उत्पादनाचा समावेश आहे. त्या अनुषंगाने आतापर्यंत १४ हजार क्विंटल सोयाबीनचे बीजोत्पादन झालं असून सद्यस्थितीत फुलोऱ्यावर असलेल्या तुर पिकाचे उत्पादन लवकरच तयार होणार आहे. अशी माहिती कृषी विद्यापीठाच्या सूत्रांनी दिली.

<><><><>

पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागातर्फे दिला जाणारा राष्ट्रीय गोपाळ रत्न पुरस्कार यंदा राज्यातल्या दोन दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी पटकावला आहे. देशी दुभत्या पशुंचे संगोपन करणाऱ्या सर्वोत्कृष्ट दुग्धोत्पादक शेतकऱ्यांच्या श्रेणीत कोल्हापूरच्या अरविंद यशवंत पाटील आणि श्रद्धा धवन यांनी पुरस्कार पटकावले आहेत. अरविंद पाटील यांनी पहिला क्रमांक मिळवला असून श्रद्धा धवन यांना तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. याखेरीज दूध उत्पादक संस्था, कृत्रिम रेतन तंत्रज्ञ या श्रेणींमध्येही पुरस्कार विजेत्यांची घोषणा झाली आहे. रोख बक्षीस, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. हा पुरस्कार पशुधन आणि दुग्धव्यवसाय क्षेत्रातल्या सर्वोच्च राष्ट्रीय सन्मानांपैकी एक आहे.

<><><><>

राज्यात नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी अर्ज करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. उद्या, मंगळवारी अर्जांची छाननी होणार आहे. त्यानंतर वैध उमेदवारांची यादी जाहीर केल्यानंतर १९ ते २१ नोव्हेंबर या दरम्यान ज्या प्रभाग किंवा अर्जावर अपिल आहे असे सोडून इतर ठिकाणी अर्ज मागे घेता येतील. २६ नोव्हेंबर रोजी उमेदवारांची चिन्हांसह अंतिम यादी जाहीर करण्यात येणार आहे.

<><><><>

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या तेराव्या स्मृतिदिनानिमित्त आज माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह ठाकरे कुटुंबीयांनी मुंबईत शिवाजी पार्क मैदानावरच्या त्यांच्या स्मृतिस्थळावर जाऊन त्यांना अभिवादन केलं. शिवसेना, मनसे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि कार्यकर्त्यांनीही बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिस्थळावर आदरांजली वाहिली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील स्मृतिस्थळावर जाऊन बाळासाहेबांना अभिवादन करणार आहेत. या निमित्ताने होणाऱ्या गर्दीच्या व्यवस्थापनासाठी शिवाजी पार्क परिसरात पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या समाज माध्यमावर बाळासाहेब ठाकरे यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><>**

महानगर गॅसच्या पाईपलाईनमधे तांत्रिक बिघाड झाल्याने मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे इथला सीएनजी पुरवठा ठप्प झाला आहे. याचा परिणाम रिक्षा, टॅक्सी, आणि शहर परिवहनच्या बसगाड्यांवर झाला आहे. औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना पर्यायी इंधन वापरण्याचा सल्ला महानगर गॅस लिमिटेडने दिला आहे. तसंच तांत्रिक बिघाड झाला असला तरी घरगुती गॅस ग्राहकांना विनाअडथळा पुरवठा केला जाईल, असं महानगर गॅस लिमिटेडने स्पष्ट केलं आहे. प्रशासन आणि महानगर गॅस लिमिटेडकडून पुरवठा सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, मात्र पुढचे काही दिवस सीएनजी मिळण्यात अडचण येण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

दिल्लीत लाल किल्ल्याजवळ झालेल्या कार बॉम्बस्फोट प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेनं आमीर राशीद अली, या कश्मिरच्या रहिवाशाला दिल्लीत अटक केली.असून त्याला पटियाला हाऊस न्यायालयाने १० दिवसांची एनआयए कोठडी दिली आहे. अमीर यानं, उमर नबी याच्या सोबतीनं स्फोटाचा कट रचला होता, असं तपास यंत्रणेनं म्हटलं आहे. या स्फोटात वापरलेल्या कारची नोंदणीही आमीर याच्या नावावर होती अशी माहिती तपास यंत्रणेनं दिली आहे.

**<><><><>**

जम्मू-काश्मीरमधल्या दहशतवादी कारवायांमध्ये लक्षणीय घट झाल्याचा दावा लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी केला आहे. नवी दिल्लीत चाणक्य संरक्षण संवाद २०२५च्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. यावर्षी आतापर्यंत ३१ दहशतवादी ठार झाले असून त्यापैकी ६१ टक्के दहशतवादी पाकिस्तानी होते, असंही ते यावेळी म्हणाले.

चाणक्य संरक्षण संवाद २०२५ हा भारतीय लष्कराच्या प्रमुख आंतरराष्ट्रीय संवादाची तिसरी आवृत्ती असून यंदाची या संवादाची संकल्पना ‘परफॉर्म टू ट्रान्सफॉर्म: सशक्त, सुरक्षित आणि विकसित भारत’ ही आहे.

<><><><>

भारत-न्यूझीलंड मुक्त व्यापार कराराबात चर्चा करण्यासाठी न्यूझीलंडचे व्यापार आणि गुंतवणूक मंत्री टॉड मॅकक्ले यांचं आज मुंबईत आगमन झालं. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांच्या न्यूझीलंड दौऱ्यानंतरच्या टप्प्यातली चर्चा मॅक्कले यांच्या या दौऱ्यात होईल.

<><><><>

बांगलादेशाच्या न्यायालयाने माजी प्रधानमंत्री शेख हसिना यांना आज फाशीची शिक्षा सुनावली. गेल्यावर्षी जुलै महिन्यात झालेल्या हिंसाचाराबद्दल त्यांना दोषी ठरवण्यात आलं आहे. हसिना यांच्यासह माजी केंद्रीय गृहमंत्री असदुज्जमन खान कमाल आणि माजी पोलीस महानिरीक्षक चौधरी अब्दुल्ला अल मामुन यांनाही दोषी ठरवण्यात आलं आहे. न्यायमूर्ती मोहम्मद गोलम मुर्तुजा मजुमदार यांच्या अध्यक्षतेखालच्या न्यायाधीकरणाने हा निकाल दिला.

दरम्यान, शेख हसिना यांनी खटल्याच्या सुनावणीला उपस्थित राहण्यासाठी बांगलादेशात परतायला नकार दिला असून सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. असदुज्जमन खान कमाल यांनी बांगलादेश सोडून इतर देशात आश्रय घेतला आहे. तर चौधरी अब्दुल्ला अल मामुन सध्या पोलीस कोठडीत असून त्यांनी गुन्हा कबूल केला आहे.

<><><><>

सौदी अरेबियामधल्या मक्का शहरातून मदिनाकडे जाणारी प्रवासी बस डिझेल टँकरवर धडकल्यानं झालेल्या अपघातात उमरा यात्रेसाठी गेलेल्या किमान ४०

भारतीयांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. मृतांमध्ये महिला आणि बालकांचाही समावेश आहे.

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी या अपघाताबद्दल शोक व्यक्त केला असून अश्या कथांनी प्रसंगी आपल्या सहवेदना मृतांच्या कुटुंबीयांसोबत असल्याचं आपल्या संदेशात म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या अपघाताबद्दल शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटूंबियांप्रति शोकभावना व्यक्त केली आहे. या दुर्घटनेत जखमी झालेल्याना लवकर बरं वाटावं अशी कामना त्यांनी केली आहे. भारतीय अधिकारी सौदी अरेबिया प्रशासनाच्या निरंतर संपर्कात असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज मध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

अपघातग्रस्तांबाबत माहिती मिळवण्यासाठी **8002440003 किंवा 0122614093, किंवा 0126614276 तसंच 0556122301** या क्रमांकावरून नियंत्रण कक्षाशी संपर्क साधता येईल.

तेलंगणाचे मुख्यमंत्री ए रेवन्त रेड्डी यांनीही या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. प्राथमिक माहितीनुसार या बसमधले बहुसंख्य प्रवासी हैदराबादचे रहिवासी असल्याचं रेड्डी यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे. दरम्यान, रेड्डी यांनी राज्याचे मुख्य सचिव आणि पोलीस महानिरीक्षक यांना या बसमधल्या प्रवाशांची माहिती गोळा करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**//<><><><><>//**